// सा विद्या या विमुक्तये //

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

**"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)**

Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone : (02462) 229242/43 Website : srtmun.ac.in

Fax : (02462) 229245 / 229325 e-mail :affi.srtmun@gmail.com

**शैक्षणिकवर्ष २०२५–२६ करीता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव व शुल्क स्विकारणे बाबत.**

**:: परिपत्रक ::**

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे, कायम संलग्नीकरणाचे, संशोधन केंद्र ई. चे प्रस्ताव हे ऑफ लाईन पध्दतीने भरुन घेणे बाबत कार्यवाही सुरु करण्यात येत असून सोबत संलग्नीकरण शुल्काचा तपशिल जोडण्यात आलेला आहे.

वरील प्रमाणे प्रस्ताव स्विकारण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर, २०२४ अशी आहे. त्यानंतर सादर करण्यात येणारे प्रस्ताव प्रति दिन रु. १००/–(रु. शंभर केवळ) प्रति विद्याशाखा/अभ्यासक्रम/तुकडी/विषय या प्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात येईल याची नोंद घेवून प्रस्ताव विहित वेळेत सादर करावेत.

संलग्नीकरण शुल्क हे स्टेट बँक ऑफ इंडिया (State Bank of India) एसीबीआय कलेक्ट ऑनलाईन ई–पेमेंट मार्फत अदा करावे. ( S.B.I. ई पेमेंट करणे बाबत माहिती सोबत जोडली आहे) तसेच NEFT/RTGS द्वारे संलग्नीकरण शुल्क हे वित्त व लेखाधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड IDBI बँक शाखा: नांदेड, IFSC CODE-IBKL0000500 खाते क्रमांक 500104000028422 मार्फत स्विकारले जातील.

महाविद्यालयाने प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे जोडावीत व खालील महत्वाच्या बाबींचीही नोंद घ्यावी:

०१. प्रस्तावाच्या दोन प्रती सादर कराव्यात.

०२. आपणाकडे सुरु असलेल्या बीए./बी.कॉम/बी.एस्सी. व एम.एम./एम.कॉम/एम.एस्सी. या व इतर अभ्यासक्रम/ विषयांच्या मुळ तुकडीस व अतिरिक्त तुकडीस शासनाने दिलेले मंजुरी आदेश, विद्यापीठाने प्रथम मुळ तुकडीस व अतिरिक्त तुकडीस दिलेले संलग्नीकरण पत्र यांच्या छायांकीत प्रती सोबत जोडाव्यात तसेच महाविद्यालयानी संस्थेचे नियमानुसार दिलेले धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे प्रमाणपत्र जोडावे.

०३. IDBI बँक मार्फत NEFT/RTGS द्वारे शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता संलग्नीकरण शुल्क विद्यापीठास भरल्यानंतर दोन दिवसाच्या आत त्याबाबतची मुळ पावती लेखा विभागातील रोख विभागातून हस्तगत करुन संलग्नीकरण विभागास प्रस्तावासह सादर करावी.

०४. मागील शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ करिता भरलेल्या पावतीची छायांकीत व साक्षांकित प्रत.

०५. विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रिडा विभाग या सर्व विभागाचे ना–हरकत ( No

Dues) प्रमाणपत्र सादर करावे. तसेच परीक्षा केंद्रासाठी घेण्यात आलेल्या अग्रीम रकमेचे समायोजन केल्याबाबतचे लेखा विभागाचे ना–हरकत (No Dues) प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच संलग्नीकरणाचे प्रस्ताव स्विकारले जातील.

तरी सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी उपरोक्त प्रमाणे दि. ०१/०९/२०२४ ते दि. ३०/०९/२०२४ या कालावधीत संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव विद्यापीठात सादर करावेत. वरील बाबींचे व विहीत मुदतीचे पालन न केल्यास विद्यापीठ नियमानुसार विलंब शुल्क भरावे लागेल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

तसेच सर्व संबंधितांना असेही कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशाप्रमाणे ई–समर्थ (E-Samarth) संगणकीय कार्य प्रणाली तयार झाल्यास वरील प्रस्ताव ई–समर्थ (E-Samarth) संगणकीय प्रणली द्वारे सादर करणे आवश्यक राहील.

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर affiliation या शिषंकातर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

"ज्ञानतीर्थ", परिसर, )(
विष्णूपुरी, नांदेड–४३१६०६ )(
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२४–२०२५/७१० )(
दिनांक :– ३१/०८/२०२४ )(

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्निकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–

१. मा. प्राचार्य, संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.

२. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे